MHSO100001382019

## नि.दि.दा.क्र.१७९/२०१९ मधील नि.क्र.१५९ खालील आदेश.

वादीने सदरचा अर्ज मयत प्रतिवादी हरिदास नारायण केचे याच्याविरुध्द दावा अवसान (अबेट) झालेबाबतचा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्याने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी हा सदरचा दावा दाखल झाल्यानंतर ता.०२.०५.२०२५ रोजी मयत झाला आहे, परंतु वादीला त्याबाबत माहित नव्हते. प्रतिवादीने वादीविरुध्द नि.दि.दा.क्र.४४९/२०२२ हा दाखल केला होता. त्यामध्ये मागील तारखेस प्रतिवादीने वारस अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज दिलेला आहे. त्याची प्रत मागील तारखेस वादीला मिळाल्यानंतर प्रतिवादी मयत झाल्याचे वादीला माहित झाले. प्रतिवादी याचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादीचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे सदरचा दावा त्याच्याविरुध्द अवसान झाला आहे. त्यामुळे सदरचा दावा अवसान झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. म्हणून त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी जबाब दिला असून त्यास त्यांनी हरकत घेतली असून सदरचा अर्ज कायदेशीर नसल्याचे म्हटले आहे. शेवटी त्यांनी वादीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमीमांसा**

**मुद्दा क्र.१ बाबतः–**

४. मी वादीतर्फे विद्वान वकील श्री.सोळसे व प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री.माने देशमुख यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी हा ता.०२.०५.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी हा मयत झाल्यानंतर ९० दिवसाच्या आत वादीने त्याचे वारस अभिलेखावर न घेतल्यामुळे त्याच्याविरुध्द दावा अवसान झाला आहे. प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब का झाला, याबाबतचे संयुक्तीक स्पष्टीकरण वादीने दिले आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारामधील वादाचे कायमचे निराकरण करण्यासाठी व न्यायाचे हितार्थ मयत प्रतिवादी याच्या विरुध्द दावा अवसान झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**नि.दि.दावा क्र.१७९/२०१९.**

**नि.क्र.१५९ खालील आदेश.**

**आदेश**

सदरचा निशाणी क्र.१५९ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.02.23 15:37:27 +0530

दि.२३.०२.२०२६.

(सोपान द. घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.२३.०२.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.२३.०२.२०२६.

आदेश स्वाक्षरित केल्याचा दि.२३.०२.२०२६.

आदेश अपलोड केल्याचा दि.२३.०२.२०२६.

स्वाक्षरित/-
(श्री.म.पां.सदाफुले)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.